## निशाणी क्र.१२ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी यांनी 'कैफीयत नाही' चा आदेश रद्द होवून मिळणेकरीता दाखल केलेला आहे.

०२. प्रतिवादी यांचे अर्जातील कथनानुसार, प्रस्तुत प्रकरणातील महसूलसंबंधी महत्त्वाची कागदपत्रे न मिळाल्याने तसेच दरम्यान प्रतिवादी क्र. १ हे वयस्कर असल्याने औषधोपचारासाठी बाहेरगावी दवाखाण्यात दाखल असल्याने प्रतिवादी वेळेत आपले म्हणणे दाखल करु शकले नाही. त्यामुळे प्रतिवादी विरूध्द दावा विना कैफीयत चालविण्याचा आदेश पारित झालेला आहे. त्यामुळे त्यांनी त्यांच्या विरुध्द पारीत करण्यात आलेला 'कैफीयत नाही' चा आदेश रद्द करण्याविषयी विनंती केली आहे.

०३. वादी यांनी सदरील अर्जावर त्यांचा आक्षेप नोंदवुन प्रतिवादीने मुदतीत लेखी जबाब दाखल केला नाही. त्यामुळे सदरील अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

०४. प्रस्तुतचा अर्ज त्यावरील शपथपत्र व म्हणणे वाचले. वादी व प्रतिवादी यांचे विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले. प्रतिवादी यांना समन्सची बजावणी झाल्यापासून किमान ९० दिवसांचे आत कैफीयत देणे आवश्यक होते. परंतु, कैफियत दाखल करणेसाठी विलंब झाल्याचे दिसून येत आहे. प्रतिवादी यांनी अर्जामध्ये कैफियत देणेस उशीर झालेचे कथन केले आहे. सबब, अर्जात नमुद कारण हे संयुक्तिक दिसून येत नाही. परंतु, प्रस्तुतचा दावा हा गुणदोषावर चालविण्याकरीता प्रतिवादी यांची कैफियत अभिलेखावर घेणे न्यायोचित होईल. प्रस्तुतची कैफियत विलंब माफ करुन अभिलेखावर घेतलेस वादी यांचे कोणतेही

नुकसान होणार नाही. परंतु, विलंब माफ करुन कैफियत अभिलेखावर न घेतलेस प्रतिवादी यांचे नुकसान होवू शकते. सबब, सदरचा अर्ज खर्चासह मंजूर करणे न्यायोचीत होईल. यास्तव पुढीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे.

## **आदेश**

०१. प्रतिवादी यांचे विरुध्द झालेला दावा विना कैफियत चालविण्याचा आदेश रद्द करण्यात येतो.

०२. प्रतिवादी यांनी सदर अर्जाचा खर्च रक्कम रूपये २००/- वादी यांना द्यावा.

Digitally signed by ROHINI VISHNU PATIL
Date: 2025.01.10 17:07:44 +0530

दिनांकः १०.०१.२०२५ (श्रीमती आर. व्ही. पाटील)
भोकरदन. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, भोकरदन.

## **प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की, पी.डी.एफ. मधील शब्द न शब्द मुळ निकालपत्राप्रमाणे आहे.

लघूलेखकाचे नावः श्रीमती एस.आर. इंगळे
न्यायालयाचे नावः दिवाणी न्यायालय क. स्तर भोकरदन
मा. साहेबांनी चेक केले
व पी.डी.एफ. दिनांकः १०.०१.२०२५

स्वाक्षरीत/-
लघुलेखकाची सही